स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक 15–10–2011 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 10. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 11. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 12. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 13. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 14. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 15. | डॉ. मिलींद माने | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर. झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 100**:— वार्ड क्र. 15, के.टी. नगर फ्रेण्ड्स कॉलोनी काटोल रोड येथे नक्षत्र उद्यानचे निर्माण करणे बाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 101**:— वार्ड क्र. 52, भानखेडा मुस्लीम कब्रस्थान येथे विविध विकास कामे करण्यास्तव रु. 50,98,746/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा व श्री. निशिकांत एन. भिवगडे आर्किटेक यांची पी.एम.सी. म्हणून नेमनुक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 102**:— वार्ड क्र. 135, मानेवाडा दहन घाट येथे विकासाची कामे तसेच सौंदर्यीकरणाचे कामास्तव रु. 29,98,205/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा व श्री. आर.डी. आर्किटेक ॲन्ड कन्सल्टन्स् यांची पी.एम.सी. म्हणून नेमनुक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 103**:— महानगरपालिकेच्या रोड डिव्हायडर व ट्रॅफीक आयलॅण्ड मधील लॅण्डस्केपच्या पुढील 3 वर्ष कालावधीकरीता देखभालीसाठी इच्छूक प्रायोजकाकडून पत्र प्राप्त झाली असून प्राप्त प्रायोजकांच्या प्रस्तावाची आर्थीक समतेची पडताळणी करुन खालील प्रमाणे प्रायोजकांना लॅण्डस्केप देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रयोजकांचे नांव | डिव्हायडर/ट्रॅफीक आयॅलण्ड | |
|---|---|---|---|
| अ) | मे. भारत पारेख, (सदस्य अभिकर्ताओ करीता कॉरपोरेट क्लब) | 1) | आर.बी.आय, चौक ते एल.आय.सी. चौक. |
| | | 2) | विधान भवन चौक बक्त बुलंदशाह पुतळयाजवळील आयलॅण्ड. |
| ब) | मे. गुप्ता कॉरर्पोरेशन | 1) | गव्हरमेंट प्रेस ते युनियन बॅंक चौक. |

उपरोक्त लॅण्डस्केप प्रायोजकांना दिल्यास महानगरपालिकेची वर्षाला रु. 1.72 लक्षाची बचत होईल. करीता उपरोक्त प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 104**:— अंबाझरी स्मशानभूमी येथील विविध विकासांची कामे करण्यास्तव रु. 36,74,415/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 105</u>:— कन्हान जलशुध्दीकरण केन्द्र व पंपींग स्टेशन, कामठी येथे अखंडीत विज पुरवठा ठेवण्याकरीता, कन्हान स्थित 220 KV सब—स्टेशन मधून आणावयाच्या 33KV dedicated feeder व त्याकरीता जलशुध्दीकरण केन्द्रात बदलावयाच्या स्विच गेअर्सच्या कामाकरीता लागणाऱ्या एकूण रु. 559.34 लक्षचे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच यातील 33KV dedicated feeder लाईन टाकण्याचे काम MSEDCL मार्फत करवून घेण्यास व उर्वरीत काम म.न.पा. तर्फे निविदेद्वारे करण्यास खालील प्रमाणे मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. 220 केव्ही कन्हान उप—केंद्रातील कामांकरीता महाराष्ट्र राज्य विज पारेषण कंपनी मर्यादित यांस रु. 27.10 लक्षचे भुगतान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. 220 केव्ही कन्हान उप—केंद्रातुन थेट कन्हान जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत dedicated लाईनचे कामाकरीता महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादित यांस रु. 346.92 लक्षचे भुगतान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. उर्वरीत, कन्हान जलशुध्दीकरण केंद्र येथील मशीनरीमधे, सल्लागाराची नियुक्ती करुन आवश्यक बदल करणे इ. रु. 185.32 लक्षचे कामाकरीता वेगवेगळया निविदा बोलविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 106</u>:— मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी सभागृहात वाचून दाखविला. प्रस्तावित विषय म.न.पा. सभागृहाच्या मंजूरीस्तव पाठविण्यासह या ठरावास समितीने मंजूर मंजुरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>—: ठराव :—</u>

नागपूर महानगरपालिकेच्या कामांमध्ये पारदर्शिता, त्याच प्रमाणे कामांची गुणवत्ता उच्च प्रतीची असावी तसेच सर्व कामे विहीत कालावधीमध्ये पूर्ण व्हावी या करिता **"प्रभावी सिटीझन चार्टर"** ची अंमलबजावणी नागपूर महानगरपालिकेत तात्काळ सुरु करणे अत्यावश्यक आहे. हा संपूर्ण निर्णय धोरणात्मक निर्णय असल्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या सर्वोच्च सभागृहाकडे तात्काळ मंजूर करण्यासाठी हा ठराव पाठवावा अशी स्थायी समिती एकमताने शिफारस करते.

## : सिटीझन चार्टर :

| कामाचे विवरण व स्वरुप | काम पूर्ण करण्याचा अवधी | कामाची प्राकलनीय राशी | संबंधीत जबाबदार अधिकारी व त्याचा संपर्क क्रमांक | कामास विलंब झाल्यास जाबादार अधिकाऱ्यावर दंडाची शास्ती | तक्रार निवारण करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| Particulars of work | Time Duration | Cost of work | Concerned Officer with contact No. | Penalty on Officer if work delayed | name of public Grievance Officer with Contact No. |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

विवक्षित अपराध द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या अधिकाऱ्या विरुध्द व नियमाचे अनुपालन करण्यात कसुर करणाऱ्या अधिकाऱ्या विरुध्द खालील प्रमाणे द्रव्यदंडाची शिक्षा प्रस्तावित करण्यास या नियमाचा अंतर्भात करुन यास मंजूरी प्रदान करावी.

1. विहीत कालावधीत कामे न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर लादता येईल असा किमान द्रव्यदंड रु. 250/– प्रती दिवस प्रमाणे व कमाल द्रव्यदंड रु. 25,000/– प्रती दिवस प्रमाणे.
2. त्याच प्रमाणे त्या नंतरही काम पूर्ण न झाल्यास तक्रार निवारण करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर लादता येईल असा किमान द्रव्यदंड रु. 500/– प्रती दिवस प्रमाणे व कमाल द्रव्यदंड रु. 50,000/– प्रती दिवस प्रमाणे.

सुचक :– हस्ता/– बाबा उर्फ विकास मैंद
अनुमोदक :– हस्ता/– सुधीर राऊत, वार्ड नं. 110
:– हस्ता/– उषाताई बोहरे, वार्ड नं. 28
:– हस्ता/– मंदाताई लेंडे, वार्ड नं. 28
:– हस्ता/– दिपकजी पटेल, वार्ड नं. 68
:– हस्ता/– कल्पनाताई डवरे, वार्ड नं. 74
:– हस्ता/– सिंधुताई उइके, वार्ड नं. 26
:– हस्ता/– कामिल अंन्सारी, वार्ड नं. 52
:– हस्ता/– अरुण डवरे
:– हस्ता/– जुल्फीकार भुत्तो, वार्ड क्र. 66
:– हस्ता/– भुषण गायधने

**<u>ठराव क्रमांक 107</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर